


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : ८०० वा बुधवार दि. १२ जून २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# अवैध बांधकामाबाबत अधिकाऱ्यांची निर्लज्ञपणे माहिती देण्यास टाळाटाळ

# राष्ट्रीय आरोग्य मिशनचे अधिकारी माहिती दडवण्यात व्यस्त




**अहो साहेब पाडलेल्या बांधकामाची संबंधित वरिष्ठ अधिकारी यांना माहिती दिली का? त्यातील शासकीय निर्लिखित न केलेले लाखो रुपयांचे साहीत्य कुठे आहे? याचा उलगडा पुढील भागात**




**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवैध व नियमबाह्य बांधकामासंदर्भात माहिती देण्यास राष्ट्रीय आरोग्य मिशनचे अधिकारी निर्लज्जपणे अक्षम्य टाळाटाळ करीत आहेत, त्यामुळे या बांधकामाबाबतचा संशय दिवसेंदिवस वाढत चालला आहे. या ठिकाणी करण्यात येत असलेले हे बांधकाम कुणाच्या आदेशावरून सुरू करण्यात आले आहे ? या बांधकामाची कोण देखरेख करतो आहे, याची कोणतीही माहिती मिळण्यास वाव नसल्यामुळे या कामात प्रचंड अनियमितता होत असल्याचे स्पष्ट होत आहे. सध्या बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालय म्हणजे अजब-गजब घटनांचे प्रमुख केंद्र बनले आहे. एकीकडे बोकाळलेला प्रचंड भ्रष्टाचार, अधिकारी-अधिकाऱ्यांमध्ये सुरू असलेली भ्रष्टाचाराची सुंदोपसुंदी, वरिष्ठांचे भ्रष्टाचाराकडे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष आणि प्रचंड अशी अनागोंदी जिल्हा रुग्णालयात ठायीठायी दिसून पडते. भ्रष्टाचाराने तर या ठिकाणी एव्हढे प्रचंड थैमान घातले आहे की, अनेक अधिकारी सकाळपासून संध्याकाळपर्यंत या ठिकाणी केवळ भ्रष्टाचारात डुंबलेले दिसून येतात. भ्रष्टाचारासाठी एक अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्याच्या कामकाजात हस्तक्षेप करतो. यासंदर्भातील माहिती जेंव्हा एखादा अधिकारी आपल्या वरिष्ठांना देतो, त्यावर वरिष्ठ जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ अधिकाऱ्यांना भ्रष्टाचार करण्यासाठी प्रोत्साहन देतात. या ठिकाणी एखाद्याला पदभार देण्याचा किंवा एखाद्याचा पदभार काढण्याचा आदेश केवळ तोंडी दिला जातो. कागदावर एखादा अधिकारी एका विशिष्ट विभागात असतो, मात्र तो प्रत्यक्षात भलत्याच ठिकाणी कार्यरत असतो. अवाजवी बिले मंजूर करणे, बेकायदेशीररित्या प्रमाणपत्रांचे वाटप करणे आणि त्यातून प्रचंड माया जमवणे हे या ठिकाणच्या अधिकाऱ्यांचे एकमेव लक्ष बनले आहे. यावरून हे स्पष्ट दिसून येते की, जिल्हा रुग्णालयात प्रचंड अशी अव्यवस्था बोकाळलेली आहे. जिल्हा जिल्हा रुग्णालयात सध्या नव्या इमारतीचे बांधकाम करण्यात येत आहे. राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत हे बांधकाम मंजूर करण्यात आल्याचे समजते.परंतु हे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असून, हे बांधकाम करीत असताना जिल्हा रुग्णालयात बऱ्याच ठिकाणी अवैधरित्या तोडफोड करण्यात आलेली आहे. यासंदर्भात जेंव्हा जिल्हा रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराच्या लोकांना विचारणा केली असता, ते अधिकाऱ्यांना धड उत्तर देत नसल्याचे दिसून येते. यावरून कंत्राटदार आणि त्यांचे कर्मचारी किती मस्तवाल असतील, हे दिसून येते. दुसरीकडे हे बांधकाम जिल्हा रुग्णालयात होत असताना यासंदर्भात रुग्णालयाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला माहिती नाही. जिल्हा शल्यचिकित्सकांना जेंव्हा यासंदर्भात माहिती विचारली असता, त्यांनी कानावर हात ठेवले. हे काम कुणी मंजूर केले? किती रुपयांचे हे काम आहे? किती दिवस चालणार आहे? या इमारतीचा पुढे काय उपयोग होणार आहे, याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सकांना पुरेपूर नाही. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने यासंदर्भात माहिती घेण्यासाठी जिल्हा रुग्णालयात बसणारे राष्ट्रीय आरोग्य मिशनच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याचा प्रय्तन केला, परंतु कुणाकडेही कशाचे ठोस उत्तर नाही. राष्ट्रीय आरोग्य मिशनचे अधिकारी देखील या विषयासंदर्भात मूग गिळून गप्प बसलेले आहेत. एनएचएमचे अधिकारी तर गेल्या अनेक दिवसांपासून पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देखील देण्यास तयार नाहीत. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने एनएचएमच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु हे अधिकारी सातत्याने टाळाटाळ करीत आहेत. हा एक प्रकारे माहिती दडवण्याचा प्रकार आहे. एकीकडे राज्य सरकार स्वच्छ व पारदर्शी असल्याचा आव आणते, त्यासाठी मोठी जाहिरातबाजी करते. दुसरकीडे मात्र अधिकारी साध्या बांधकामाची माहिती देण्यास टाळाटाळ करतात. यावरून आरोग्य विभागात बोकाळलेली अनागोंदी व कमालीची गुप्तता बाळगण्याच्या प्रवृत्तीची आपल्याला कल्पना येऊ शकते. अशाप्रकारची गुप्तता तेंव्हाच बाळगली जाते तेंव्हा यामध्ये कुठेतरी भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे जिल्हा रुग्णालयात भ्रष्टाचार बोकाळलेला आहे, हे स्पष्टपणे समोर आलेले आहे. या भ्रष्टाचारासंदर्भात जिल्हा रुग्णालयाच्या प्रशासनाने, एनएचएमच्या अधिकाऱ्यांनी कितीही गुप्तता बाळगली तरीही दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या भ्रष्टाचाराचा भंडाफोड करीतच राहणार आहे. काहीही झाले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत राहणार आहे.

**सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग बुलढाणा**
**शुद्ध पिण्याचे पाणी प्रश्न गुलदस्त्यात?**

**अजून बरेच काही पुढील भागात**

# मायक्रोफायनान्सच्या वसुली कर्मचाऱ्यांना लुटले

## गिरडा घाटात दीड लाख केले लंपास...

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील मायक्रोफायनान्सच्या धनिक वसुली कर्मचाऱ्यांना गिरडा घाटात दरोडेखोरांनी मारहाण करत त्यांच्याकडील दीड लाख रुपये पळविले. ही घटना १० जूनच्या रात्री गिरडा गावापासून सुमारे सात किमी अंतरावर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात फर्दापूर पोलिस ठाण्यातंर्गत घडली.पंजाब थिगळे, धीरज शांतम आणि संघानंद इंगळे हे धनिक मायक्रोफायनान्सचे कर्मचारी १० जून रोजी सोयगाव तालुक्यात कर्ज वसुलीसाठी गेले होते. रात्री बुलडाणा येथे परत येत असताना त्यांना उशीर झाला. हे तिघे दोन दुचाकीने येत होते. दरम्यान टिटवी येथून काही जणांकडील कर्ज वसुली करून ते गिरडा घाट चढून वर येत असतांना महादेव मंदिराजवळ पाच ते सहा जणांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. लोखंडी रॉडने त्यांनी हा हल्लाचढवला होता. त्यात धीरज शांतम हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बुलढाण्यात उपचार सुरू आहेत. कर्जवसुली केलेल्या पैशाची बाग पंजाब थिगळे कडे होती. चोरट्यांच्या तावडीतून ते कसेबसे



निसटले परंतू चोरट्यांनी लगतच्या जंगलातही त्यांचा पाठलाग करत पैसे व मोबाईल हिसकावला. नंतर या प्रकाराची माहिती थिगळे यांनी पिंपळवाडी येथील स्थानिकांच्या मदतीने वरिष्ठांना आणि बुलढाणा पोलिसांनाही देण्यात आली. मात्र घटनास्थळ हे सोयगाव तालुक्यातील फर्दापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत येते. तेथे नंतर तक्रार देण्यात आली.

# २१ वर्षीय युवतीचा विनयभंग

**जनसंचलन/ शेगाव**

येथील शिवनेरी चौक परिसरात एका विशिष्ट समाजाच्या व्यक्ती कडून २१ वर्षीय युवतीचा विनयभंग झाल्याची घटना १० जून रोजी रात्री ८.३० वाजता घडली. याबाबत पिडीत युवती कडून शहर पोलीसात तक्रार दिली की, पोलीस भरतीच्या तयारी करिता मी दररोज मुरारका कॉलेजच्या मैदानावर मैत्रीणीसह प्रशिक्षण करिता जाते. १० जून रोजी घरी जात असताना सराफ हॉस्पीटल समोर शिवनेरी चौक येथुन माझ्या दोन्हीही मैत्रीनी हया समोर चालत होत्या व मी त्यांच्या मागे जात असताना एक इसम हा तेथे उभ्या असलेल्या ट्रक क्रं एम एच २६ए. डी १०८२ मधुन उतरुन माझे जवळ आला व त्याने वाइट उददेशाने माझी गालाची पप्पी घेण्याचा प्रयत्न केला असता त्याचा हाताचा मला धक्का लागल्याने मी जोराने ओरडले असता त्या ठिकाणी लोंकाची गर्दी जमा झाली. त्या गर्दीचा फायदा घेवुन आरोपी हा तेथुन निघून गेला असता तेथे उभ्या असलेल्या लोंकाकडुन मला त्याचे नाव शेख अहमद शेख समद रा खमु जमदार नगर ३ शेगाव येथील असल्याचे समजले. तरी त्याचे वर कायदेशीर कारवाई व्हावी अशा फिचे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी शेख अहमद शेख समद रा. खमु जमदार नगर शेगाव विरुद्ध कलम ३५४, ३५४ अ भादंवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मरणोत्तर अवयवदान करण्याचा संकल्प आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केला व्यक्त

**जनसंचलन/बुलडाणा**

मनोत्तर अवयदान करणाऱ्याचा टक्का अत्यल्प आहे हा टक्का वाढणे गरजेचा असून आपण ही मरणोत्तर अवयवदान करण्याचा संकल्प केला आहे अशी प्रतिक्रिया केंद्रीय आरोग्य आणि कुटुब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली केंद्रीय आरोग्य कुटुब कल्याण मंत्रालयाचा पदभार आज ११ जुन रोजी स्वीकारल्या नंतर आरोग्य आणि कुटुब कल्याण राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी ही भावना व्यक्त केली देशातील प्रत्येक नागरिकांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य जपण्याला आपण प्राथमिकता देणार असून गोरगरीब जनतेला आरोग्य सुविधा मिळवून देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात येणाऱ्या काळात काम करणार आहे देशातील आरोग्य सुविधा अधिक मजबूत करून सर्वसामान्य गोरगरीब जनतेला तिचा लाभ उत्तमरीत्या कसा मिळेल या दृष्टिकोनातूनही उपाययोजना करणार आहे देशात अवदान करण्याची संख्या कमी आहे या मध्ये वाढ होणे



गरजेचे आहे माझ्यावर आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालयाची जबाबदारी पतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्यावर सोपविली आहे तीला सार्थ ठरविण्यासाठी आरोग्य सेवा गतीमान करणार असल्याचे त्यांनी सांगीतल

# जिल्हा रुग्णालयाच्या पार्किंगमधून दुचाकी चोरीला

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती असलेल्या रुग्णाच्या नातेवाईकासोबत वाईट घटना घडली. पार्किंग परिसरातून डिस्कवर कंपनीची दुचाकी चोरीला गेल्याची घटना शुक्रवार ७ जून रोजी उघडकीस आली आहे. जाफ्राबाद तालुक्यातील भारज येथील रहिवासी गजानन भिका हूसके हे बहिणीच्या उपचारासाठी १ जूनपासून बुलढाणा येथील सामान्य रुग्णालयात आले आहेत. देखरेख आणि बहिणीच्या काळजीसाठी ते देखील दवाखान्यामध्ये उपस्थित आहेत. दरम्यान, सोमवार ३ जुनच्या रात्री बसस्थानक परिसरामागील भोजनालयात जेवण करून आल्यानंतर हूसके यांनी दररोजप्रमाणे त्यांची डिस्कवर कंपनीची दुचाकी रुग्णालय परिसरात लावली. त्यानंतर ते बहिणीला भेटण्यासाठी वार्डात गेले. काही वेळानंतर रात्री ११ वाजेच्या सुमारास रुग्णालयातून बाहेर आल्यानंतर पार्किंगमध्ये लावलेली डिस्कवर हंड्रेड दुचाकी क्रमांक एम. एच. २१ ए.ए.९२२० त्यांना दिसून आली नाही. त्यामुळे त्यांनी इतरत्र खूप शोधली. मात्र गाडी मिळूननत्यांनी दुचाकी चोरीला गेल्याची तक्रार शुक्रवार ७ जून रोजी पोलिसांत दिली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# शेगावात घरफोडी तलवारधारी चोरटा सीसी कॅमेऱ्यात कैद

**जनसंचलन/ शेगाव**

घरात कोणी नसताना घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून घरफोडी केल्याची घटना येथील धनोकार नगरात १० जून रोजी पहाटे उघडकीस आली. ही घरफोडी तिघांनी मिळून केली असून यातील तीघांपैकी एकाच्या हातात तलवारीसारखे धारदार शस्त्र असल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसत आहे.धनोकार नगरातील रहिवासी मिराबाई कोकाटे घराला कुलूप लाऊन बाहेरगावी गेल्या होत्या. सीसीटीव्ही फुटेजनुसार १० जून रोजी पहाटे ३ वाजताच्या सुमारास तीन चोरटे तोंडाला बांधून दुचाकीने धनोकार नगरात दाखल झाले. दोन चोरट्यांनी मिराबाई कोकाटे यांच्या घराचे कुलूप तोडले. एक चोरटा तलवारीसारखे शस्त्र हातात घेवून नजर ठेवून होता.

# डोणगाव येथील पॉवर स्टेशनवर पडल्या एका पाठोपाठ एक तीन विजा डोणगाव परिसराचा वीज पुरवठा खंडित

**जनसंचलन/ डोणगाव**

येथे सोमवारी वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसादरम्यान मालेगाव रोडवर असेलेल्या पावर स्टेशनवर एकापाठोपाठ तीन विजा पडल्याने डोणगावसह परिसरातील गावांचा वीज पुरवठा खंडीत झाला आहे. दरम्यान दुरुस्तीचेही काम महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी हाती घेतले आहे. डोणगाव येथे १० जून रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू झाला. या दरम्यान मालेगाव रोडवर असणाऱ्या महावितरणच्या पावर स्टेशनवरील विद्युत करंट मोजण्याच्या पिटीवरच विज पडल्याने ती फुटून वीज पुरवठा खंडीत झाला. त्यामुळे डोणगावसह परिसरातील गावांमध्ये त्यामुळे आता अंधार आहे. महावितरणचे अभियंता नीलेश ठाकरे यांच्याशी संपर्क साधला असता पिटीवर विज पडली व ती फुटल्या मुळे परिसरातील विदयुत पुरवठा बंद आहे. यूध्दपातळीवर सुरू करण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. एकाच वेळी येथे तीन वेळा वीज पडली आहे. कार्यालयाजवळील बोरीच्या झाडावर पहिली, दुसरी कर्मचारी वसाहतीच्या मागे आणि तिसरी थेट पीटीवर पडली.

# शिंदी-चंदनपुर शिवारातील फुटलेल्या नादुरुस्त तलावाचे पाणी कोठे पाझरले

## माती टाकून केलेल्या पाझर तलावाच्या निकृष्ट कामाची चौकशी करा

## उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्याकडे तक्रार

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

शिंदी व चंदनपुर शिवारातील सीमेवर पाझर तलावाची निर्मिती करण्यात आली होती या पाझर तलावामुळे २५ हेक्टर शेतजमीन पाण्याखाली येणार होती,परंतु संबंधित ठेकेदार व अधिकारी यांनी संगणमत करून पाझर तलावाची जी भिंत आहे त्या भिंतीवर फक्त काळी मातीचा थर टाकला होता कुठल्याही प्रकारची दबई केल्या गेली नसल्यामुळे सदर बाजार तलाव २० सप्टेंबर २०२० साली फुटला होता यामध्ये १८ शेतकऱ्यांचे पिके खरडून गेली होती त्यांना आज पर्यंत एकही रुपयाची मदत शासनाने दिली नाही,परंतु चार वर्षे उलटले तरी सुद्धा जलसंधारण विभागाच्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी या फुटलेल्या बाजार तलावाकडे ढुंकून सुद्धा बघितले नाही ? त्यामुळे सदर पाझर तलावाच्या नावाखाली किंवा दुरुस्तीच्या नावाखाली लाखो रुपये हडप केल्याची शंका उपस्थित होत आहे या पाझर तलावाकडे कुठल्याही कर्मचारी लक्ष देण्यासाठी पुढे येत नसून तलाव फुटण्याच्या अगोदर सुद्धा शेतकरी बांधवांनी कर्मचाऱ्यांना सूचना दिली होती त्यामुळे सदर नादुरुस्त पाझर तलावाच्या संबंधित सर्व कामाची चौकशी करून दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांची व ठेकेदारांवर कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन




खंडारे यांनी उपविभागीय जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद देऊळगाव राजा यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे त्यामुळे लवकरात लवकर चौकशी लागून सत्य बाहेर येण्याची

# बाल विकास धोरणाबाबत सूचना, हरकती आमंत्रित

**जनसंचलन/बुलडाणा**

महिला व बाल विकास विभागातर्फे सुधारीत बाल धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला आहे. याबाबत सूचना आणि हरकती असल्यास नागरिकांनी त्या सादर कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. महिला व बाल विकास विभागांतर्गत बाल धोरणाचा प्रारुप मसुदा तयार करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्ती व शासनाचे अधिकारी यांची समिती गठित करण्यात आली. समितीने महाराष्ट्र राज्य बाल धोरण व कृती आराखडा २०२२ मसुदा तयार केला आहे. सदर प्रस्तावित बाल धोरण आणि महाराष्ट्र शासनाचे कृती आराखडा २०२२ हा इंग्रजी व मराठी भाषेमध्ये womenchild.maharashtra.gov.in आणि wcdcommpune.com संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. प्रस्तावित बाल धोरण इंग्रजीमध्ये तयार करण्यात आले असून त्यांचे मराठीत भाषांतर करण्यात आले आहे. या बाल धोरण आणि कृती आराखड्यामध्ये आवश्यक बाबी, सुचना, सुधारणा, तसेच मराठी भाषेतील भाषांतरीत मसुद्यामध्ये शब्द रचना, व्याकरणाबाबत हरकती व सूचना नागरिकांकडून मागविण्यात आल्या आहेत. प्रस्तावित महाराष्ट्र राज्य बाल धोरण व कृती आराखडा २०२२ च्या संदर्भाने नागरिकांच्या हरकती आणि सुचना दि. ३० जुन २०२४ पर्यंत महिला व बाल विकास आयुक्तालय, २८ राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ, पुणे १ या पत्त्यावर अथवा . या ई-मेलवर पाठविण्यात याव्यात, असे आवाहन महिला व बाल विकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# डोणगाव परिसरात विजेचा लपंडाव नागरिक त्रस्त...

**जनसंचलन/ डोणगाव**



परिसरात गत काही दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू असुन नागरिक त्रस्त झाले आहेत. दर तासाला वीजपुरवठा खंडित होत असल्याचे ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. डोणगाव परिसरात गत काही दिवसांपासून दर तासाला वीजपुरवठा खंडित होत आहे. गावात अनेक खांबावर तारा लटकलेल्या आहेत. थोडी हवा जरी आली. तरी लॉबकळलेल्या तारा एकमेकांना स्पर्श होऊन विद्युत पुरवठा खंडित होत आहे. तसेच वारा वादळाने काही झाडाच्या फांद्या विद्युत वाहकाच्या तारावर कोसळल्या किंवा विद्युत खांबाची वारा वादळाने तुट झाली तर त्या दुरुस्तीला २४-२४ तास काम होत नसल्याने विद्युत वितरण कंपनीच्या या गलथड कारवारांमुळे नागरिकांना अंधारात राहावे लागते.येथे शहरात जवळपास ३० डिप्या आहेत. तसेच शेती फिडरच्या शंभर डीपी आहेत. या १३० डीपीचा कारभार हे फक्त तीनच कर्मचाऱ्यावर असून येथे कर्मचाऱ्यांची सुद्धा संख्या वाढ करण्याची अत्यंत गरज आहे. शहरात असे काही परिसर आहेत. जेथे विद्युत खांबावर शेकडो कनेक्शन आहे. तिथे मोठी दुर्घटना होण्याची सुद्धा भीती व्यक्त केल्या जात आहे. तरी येथे लोंबकळलेल्या तारा नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळणाऱ्या आहेत. तरी विद्युत वितरण कंपनीने याकडे लक्ष देऊन येथील विद्युत वाहक तारांची पुनर्बांधणी करावी. तसेच येथील कर्मचाऱ्यांकडून होत असलेला त्रास गांभीर्याने घ्यावा व येथे कर्मचारी वाढची मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे.

# एक राज्य- एक गणवेशसाठी निघाले १२६ कोटींचे टेंडर

**वृत्तसंस्था/नागपूर**

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून राज्यात एक राज्य- एक गणवेश धोरण राबविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. त्यासाठी यंदा शासन स्तरावरून जिल्हा व तालुकास्तरावर कापड उपलब्ध करून ते बचत गटाच्या माध्यमातून शिवून घेतले जाणार आहे.यासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळाला या कामासाठी १२६ कोटींचे टेंडर मिळाले आहे. तर वर्क ऑर्डर सुद्धा काढण्यात आले आहे.

महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळा तर्फे बचत गटांना गणवेश शिवण्याचे काम दिले जाणार आहे. मात्र, जूनचा पहिला आठवडा होत आला असताना अनेक ठिकाणी तालुकापातळीवर कापड मिळालेले नाही. त्यामुळे पहिल्या दिवशी जिल्हा परिषद शाळांचे विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत १५१५ शाळा आहेत. शाळेतिल विद्यार्थ्यांना नवीन गणवेश देण्याचा राज्य सरकारचा उपक्रम आहे. यासाठी टेंडर निघाले असून गणवेशाचे कपड हे सरकारच पुरवणार आहे. तर एका विद्यार्थ्यांला २०० रूपयाचा गणवेश मिळणार आहे. १०० रूपयाचा कापड आणि १०० रुपये गणवेशाची सिलाई दिली जाईल. आणि गणवेश शिवण्याचे काम बचत गटाला दिले गेले आहे. केंद्र सरकारच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीत शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील मुले, तसेच दारिद्र्यरेषेखालील पालकांची मुले यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. तसेच, सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून योजनेचा लाभ दारिद्र्यरेषेवरील पालकांच्या मुलांनाही देण्याबाबतचा शासन निर्णय घेतला. मात्र, हा निर्णय शाळा सुरू होण्यापूर्वी अवघ्या काही दिवसांत घेतल्याने गेल्या वर्षी गणवेशाबाबत गोंधळ निर्माण झाला होता. त्यामुळे राज्य शासनाने एक राज्य एक गणवेश धोरण राबविण्याचा निर्णय घेतला.२०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सर्व पात्र विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत करण्यात यावी, अशा सूचना शिक्षण विभागाने दिल्या होत्या. त्यासाठी महाराष्ट्र



शिक्षण परिषदेने टेंडर प्रक्रिया राबविली. महिला आर्थिक विकास महामंडळाकडून कापड पुरवून महिला बचत गटामार्फत गणवेश शिलाई होणार आहे. शिलाई करून तयार झालेले गणवेश शाळा मुख्याध्यापकांना दिले जाणार आहेत. त्यासाठी महामंडळाकडून तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे कापड दिले जाणार आहेत. मात्र, अद्याप तालुकास्तरावर कापड उपलब्ध झालेले नाही. अशी माहिती मिळालेली आहे. बचत गटांना शिलाईबाबत कळविलेले असल्याने ते सज्ज आहेत.एक राज्य एक गणवेश अंतर्गत मुलांसाठी आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाची पँट किंवा हाफ पँट, मुलींना आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाचा स्कर्ट किंवा गडद निळ्या रंगाची सलवार, आकाशी रंगाची कमीज असे गणवेशाचे स्वरूप असणार आहे.

# आंबेटाकळी रोडवर वीज पडून दोन बैल ठार



**जनसंचलन/ खामगाव**

तालुक्यातील बोरी आडगाव ते आंबेटाकळी रोडवर शेतात बांधून ठेवलेल्या दोन बैलांचा वीज पडून मृत्यू झाल्याची घटना १० जून रोजी रात्री वाजताच्या दरम्यान घडली.१० जून रोजी सायंकाळी ६ वाजतापासून जोरदार वारा सुटला त्यानंतर विजांच्या कडकडाटात जोरदार पावसाला सुरुवात झाली जवळपास एक तास पाऊस बरसला. बोरी अडगाव येथील शेख मूमताजा यांच्या आंबेटाकळी रोडवरील शेतात दोन बैल बांधून ठेवले होते. वीजा पडल्याने दोन्ही बैलांचा मृत्यू झाला.

# देहव्यापारावर पोलिसांचा छापा ८ अटकेत
## वेगवेगळ्या जिल्ह्यातील ३ महिलांची सुटका...

**जनसंचलन/ शेगाव**

येथील खामगाव रोडलालागून असलेल्या एका हॉटेलमधील देहव्यापारावर पोलिसांनी ९ जून रोजी छापा टाकून ८ आरोपीना अटक केली तर ३ पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक आशिष गंद्रे यांनी शहर पोलिसात फिर्याद दिली की, गुप्त खबऱ्याच्या आधारे खामगाव रोड लगत असलेल्या हॉटेल सुप्रीम मध्ये पोलिस स्टाफ व शासकीय पंचासमक्ष छापा टाकला असता याठिकाणी ठाणे जिल्ह्यातील ३७ वर्षीय महिला, वर्धा जिल्ह्यातील ३१ वर्षीय महिला व अमरावती मधील २३ वर्षीय युवतीकडून वेश्या व्यवसाय करून घेतल्या जात असल्याचे दिसले. सदर तिन्ही पिडीत महिलांची सुटका करून यावेळी आरोपींकडून मोटारसायकल ४ नग किंमत अंदाजे २ लाख ५० हजार रुपये, नगदि १२ हजार ३०० रुपये, मोबाइल १० नग कि ९४ हजार, इतर साहित्य २२० रुपये असा



एकुण३ लाख ११ हजार ५२० रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी श्रीकृष्ण गोकुळ शेंडगे वय २६ वर्षे रा. शेलोडी ता. खामगांव, रोहीत उर्फ महादेव मधुकर टेकाळे वय २५ वर्षे रा. गीतेच्या मळ्याजवळ अकोट रोड शेगांव, निलेश भारत टकले वय २९ वर्षे रा. शेलोडी ता. खामगांव, दिपक सुरेश खेळकर वय २२ वर्षे रा. निमकर्दा ता.बाळापुर जि. अकोला, योगेश गणेश ठाकरे वय २२ वर्षे रा. निमकर्दा ता. बाळापुर जि. अकोला, प्रविण नारायण दोलतडे वय ३६ वर्षे रा. शेलोडी ता खामगाव, शरद प्रभुदास शेंडे ३५ वर्ष रा. निमकर्दा ता. बाळापुर जि. अकोला, विनोद श्रीराम खेळकर वय ३२ वर्षे रा. निमकर्दा ता. बाळापुर या आरोपितांचे कृत्य कलम ३, ४, ५, स्त्रियांचे अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ अन्वये होत असल्याच्या फिर्यादी वरून त्यांचे विरुद्ध कलम ३,४,५ स्त्रियांचे अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार हेमंत ठाकरे करीत आहेत.

# लोकसभेतील यशानंतर कॉंग्रेस घेणार धाडसी निर्णय?...

## विधानसभेच्या २८८ जागा लढण्याच्या तयारीत,या नेत्याचे मोठे वक्तव्य...

**वृत्तसंस्था/नागपूर**

महाविकास आघाडीतील मित्र पक्ष २८८ जागांची तयारी करत असल्यास कॉंग्रेसने देखील तयारी ठेवावी. मैत्रीपूर्ण लढतीनंतर आघाडी करता येऊ शकते, अशी रोखठोक भूमिका कॉंग्रेसचे आमदार अभिजित वंजारी यांनी व्यक्त केली आहे. कॉंग्रेसने स्वबळाची तयारी करावी, अशी भूमिका माध्यमांशी संवाद साधताना आमदार वंजारी यांनी मांडली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीचा विश्वास सध्या उंचावला आहे. सर्वांना आता विधानसभेचे वेध लागले असून दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत.लोकसभा निवडणुकीत राज्यातील १५४ विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीने बाजी मारली, असे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते शरद पवार यांनी आधीच स्पष्ट केले. यावरून विधानसभेचा अंदाज सर्वांना आला आहे. इतर राज्यांच्या तुलनेत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे कार्य अधिक प्रभावी राहिले. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने झेप घेतली आणि अधिक ताकदीने समोर आला, असे देखील वंजारी यांनी अधोरेखित केले आहे. तर भाजपने केलेले फोडाफोडीचे राजकारण सर्वसामान्यांना पटलेले नाही. येत्या विधानसभा निवडणुकीतही महाविकास आघाडीच विजयी होणार, असे वंजारी म्हणाले. शिवसेना (ठाकरे गट) २८८ जागांची तयारी करणार असल्याकडे लक्ष वेधले असता, वंजारींनी याबाबत आमचा प्रश्नच उद्भवत नाही. नाना पटोले यांनी आधीच ङ्गएकला चलो रेङ्की भूमिका घेतली. मित्रपक्षाची तयारी असेल तर आमचीही तयारी राहील. विदर्भात कॉंग्रेसला बहुमत मिळाले. याचाही सर्वांनी विचार करावा. राज्यातील २८८ जागांबाबत महाविकास आघाडीचे नेते निर्णय घेतील पण, कॉंग्रेसनेही सर्व जागांची तयारी ठेवावी असे सूचित केले आहे.तीन पक्षांत लढताना २८८ जागांचे विभाजन, जागावाटपात समन्वय साधताना चांगल्या कार्यकर्त्यांचे नुकसान होते. मित्रपक्ष म्हणून मैत्रीपूर्ण लढत करून, निवडणुकीनंतर आघाडी करता येईल. विधानसभेत वेगळे लढलो तरी, आघाडी करून सरकार स्थापन करता येऊ शकते. तिन्ही नेत्यांनी बसून हा विचार करायला पाहिजे. नंतर दिल्लीत पक्षश्रेष्ठींसोबत चर्चा करून लवकर तयारी सुरू करण्याची



गरज आहे, असेही वंजारी यांनी स्पष्ट केले.सर्व जागांसाठी उमेदवार आहे का, असे विचारले असता, कॉंग्रेस राष्ट्रीय पक्ष आहे. दीड-दोन दशकांपूर्वी सर्वाधिक संख्या आमचीच राहिली. पक्षाचे वलय, वर्चस्व होते. २८८ उमेदवार मिळण्यास अडचण नाही. स्वबळावर असो नाही तर, महाआघाडीत एकत्र लढलो तरी, सर्वात मोठा पक्ष कॉंग्रेसच राहील, असा दावाही अभिजित वंजारी यांनी केला.

---

# बालकांना दत्तक घेण्यासाठी सुधारीत नियमावली जाहीर

**जनसंचलन/बुलडाणा**

दत्तक विधान प्रक्रिया करण्यासाठी बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ आणि सुधारीत २०२१ व दत्तक नियमावली २०२२ नुसार दत्तक विधान प्रक्रिया राबविल्या जाते. बालकांना दत्तक घेण्यासाठी सुधारीत नियमावली जाहीर करण्यात आली आहे. नियमावलीनुसार बाळ दत्तक घेण्यासाठी भावी दत्तक माता ही शारीरिक, मानसिक, भावनात्मक आणि आर्थिक स्वरूपात सक्षम असणे आवश्यक आहे. सदर दत्तक विधान प्रक्रियेसाठी दोन्ही पती-पत्नी यांची सहमती असणे आवश्यक आहे. एका दत्तकसाठी बालक किंवा बालिका निवडू शकते, एकल पुरुष फक्त बालकाची निवड करु शकतात. बाळ दत्तक घेण्यासाठीची पालकांची वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. २ वर्षाच्या आतील बालकाला दत्तक घेण्यासाठी भावी दत्तक माता-पिता यांची कमाल वयोमर्यादा संयुक्तिक ही ८५ वर्ष आहे. तर एकल भावी माता-पिता यांची कमाल वयोमर्यादा ४० वर्षे आहे. २ से ४ वर्षापर्यंतचे बालकासाठी अनुक्रमे ९० वर्षे आणि ४५ वर्षे आहे. ४ वर्ष ते ८ वर्षापर्यंतचे बालकांसाठी १०० वर्षे आणि ५० वर्षे वय असावे. ८ वर्ष ते १८ वर्षापर्यंतचे बालकांसाठी ११० वर्षे आणि ५५ वर्षे असावे. दत्तक विधानासाठी अर्ज करावा लागतो. दत्तक विधानामार्फत बाळ घेऊ



इच्छिणाऱ्या भावी माता -पिता यांनी cara.wed.gov.in या पोर्टलवर अर्ज करावा. अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष. सुवर्ण नगर, मुट्ठे ले आऊट, बस स्टँडच्या मागे, डॉ. जोशी हॉस्पिटल शेजारी, बुलडाणा येथे भेट देऊ शकतात. तसेच यशोधाम, दि लव्ह ट्रस्ट, खामगाव रोड, सुंदरखेड, बुलडाणा या विशेष दत्तक संस्थेस भेट देऊन माहिती प्राप्त करु घेऊ शकतात. दत्तक विधानासाठी अर्ज केल्यानंतर गृह अध्ययन अहवालासाठी अर्जदारांना निकटची दत्तक संस्था निवडावी लागते, सदर अर्ज केल्यानंतर गृह अध्ययन अहवाल करण्यासाठी सदर संस्थेने ६० दिवसाच्या आत अर्जदाराच्या घरी जाऊन अहवाल तयार करणे बंधनकारक आहे. सदर गृह अध्ययन अहवाल हा ३ वर्षांसाठी लागू राहिल. दत्तक विधान संस्थेमार्फत गृह असायन अहवाल हा कारा पोर्टलवर अपलोड केल्यानंतर एक महिन्यानंतर आपल्याला आपल्या पसंतीनुसार बाळ दिसणे सुरु होते. ज्यामध्ये बाळाचा फोटो, मेडीकल रिपार्ट, बालक अभ्यास अहवाल असते. बाळ आपणास पसंत पडल्यास बालकास ४८ तासाच्या आत कारा पोर्टलवर आरक्षित करावे लागते. त्यानंतर सदर भावी माता-पिता यांची दत्तक विधान समिती बैठकीत साक्षात्कार आणि आकलन केल्यानंतर भावी माता-पित्ता हे बालकांसाठी योग्य वाटल्यास बालक पालकांच्या ताब्यात तात्पुरत्या स्वरुपात प्रि-फॉस्टर केअर अंतर्गत दिले जाते. संस्थेमार्फत सदर बालक व पालकांची नस्ती तयार करुन न्यायालयामार्फत पालकांना दत्तक आदेश दिला जातो.

# आदिवासी विकास प्रकल्पाच्या वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु

**जनसंचलन/ बुलडाणा**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला अंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील आदिवासी मुले व मुलींच्या पाच शासकीय वसतीगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुकांनी यासाठी अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दहावी व बारावी उत्तीर्ण आदिवासी (एसटी) विद्यार्थ्यांकरीता पुढील लगतच्या अभ्यासक्रमाकरीता प्रवेश देण्याकरीता swayam.maha-online.gov.in या संकेतस्थळावर दि. ३० जून २०२४ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. ऑनलाईन फॉर्म भरणे, फॉर्म व सोबतचे दस्ताऐवज संबधित वसतिगृहामध्ये असलेल्या रिक्त जागेकरीता अर्ज घेण्यात येत आहे. जिल्ह्यात आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, राजीव गांधी सैनिकी शाळेजवळ, अजिंठा रोड, कोलवड, ता. बुलडाणा, आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह जिजामाता कॉलेजजवळ, बुलडाणा, आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह बँक ऑफ महाराष्ट्र जवळ, संग्रामपूर, ता. संग्रामपूर, आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, बुलडाणा अर्बन बँकेजवळ संग्रामपूर, ता. संग्रामपूर, आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह जी. एस. कॉलेजच्या मागे खामगाव, ता. खामगाव, वसतिगृहाकरीता दहावी आणि बारावीच्या पुढील लगतच्या अभ्यासक्रमाकरीता वसतिगृहाकरीता सातवी, दहावी आणि बारावीच्या पुढील लगतच्या अभ्यासक्रमाकरीता अर्ज मागविण्यात येत आहे. तसेच सद्यस्थितीत प्री मॅट्रीक आणि कनिष्ठ महाविद्यालय या अभ्यासकरीता संकेतस्थळ सुरु करण्यात आले आहे. वसतिगृहामध्ये प्रवेशाबाबत विद्यार्थी, विद्यार्थिनी या अनुसूचित जमातीचे असाव्यात. विद्यार्थ्यांकडे व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. चालू वर्षातील तहसिलदाराचा मूळ उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे स्वतःचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे बंधनकारक आहे. सदरचे खाते आधार कार्ड आणि मोबाईलशी सलंग्न असणे आवश्यक आहे. बँक खाते प्रत सोबत जोडावी. विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था शहर, तालुक्याच्या ठिकाणी आहे, अशा शहरातील सदर विद्यार्थ्यांचे पालक रहिवासी नसावेत. विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेली संस्था मान्यताप्राप्त महाविद्यालय, संस्थेमध्ये आणि मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांस प्रवेश घेतलेला असावा. विद्यार्थ्यांने आदिवासी विकास विभागाच्या संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे.